**कृपया प्रसिध्दीसाठी** **4 फेब्रुवारी 2009**

## रेल्वे प्रवाशांच्या उद्रेकाला रेल्वे मंत्रीच जबाबदार - राम नाईक

**मुंबई, बुधवार :** " मुंबईतील रेल्वे प्रवाशांच्या उद्रेकाला रेल्वे मंत्री श्री. लालू प्रसाद यांची संवेदनहीनता व संवादहीनताच जबाबदार आहे," अशी प्रतिक्रिया माजी रेल्वे राज्य मंत्री (स्वतंत्र प्रभार) श्री. राम नाईक यांनी व्यक्त केली आहे.

बोरीवली रेल्वे स्थानकावर आज संतप्त प्रवाशांनी केलेल्या उत्स्फुर्त आंदोलनाबाबत प्रतिक्रिया व्यक्त करताना श्री. नाईक पुढे म्हणाले,"फलाट क्र. 7 व 8 वर गाडीसाठी प्रवाशांना 3-4 फर्लांग चालावे लागते. अपेक्षित गाडी रद्द झाल्यानंतर किंवा अचानक फलाट क्रमांक बदलल्यावर प्रवाशांचा राग अनावर होतो. आज प्रवाशांच्या सहनशीलतेचा कडेलोट झाला, धुमसत असलेला ज्वालामुखी पेटला. चौपदरीकरण होऊनही प्रवाश्यांना समाधानकारक सेवा मिळत नाही. रेल्वे प्रवाशांच्या विविध प्रश्नांसाठी रेल्वे प्रवासी संघटनांनीच नव्हे तर माजी रेल्वे मंत्री म्हणून स्वतः मीही वेळोवेळी रेल्वे मंत्र्यांची भेट मागितली. पत्रे पाठविली. तरीही रेल्वे मंत्र्यांना वेळ मिळत नाही. त्याशिवाय पश्चिम रेल्वेचे प्रमुख महाव्यवस्थापकही गेली दोन वर्षे सतत बदलत ठेवले आहे. यामुळे पश्चिम रेल्वेच्या प्रवाशांची गा-हाणी ऐकायला कोणीच वाली नाही अशी स्थिती निर्माण झाली. आजचे आंदोलन ही त्यावरची प्रवाशांची संतप्त प्रतिक्रिया आहे."

**(कार्यालय सचिव)**